जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२४/१२/२०२३
## दि.२३/१२/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो.स्टे.८२५/२०२३,भादविक ३०२ |
| **फिर्यादी** | पियुष कांबळे,वय १९ वर्षे, सध्या रा.दत्तवाडी, पुणे |
| **आरोपीत** | तानाजी शिवाजी कांबळे वय ४५ वर्षे,रा.स.नं.४३/२ स्वामी समर्थ लेन नं.०१ दत्तनगर चौक पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २२/१२/२०२३ रोजी रात्रौ २२/०० ते २३/०० वा.चे दरम्यान स.नं. ४३/२ बी-२ स्वामी समर्थ लेननं.०१ दत्तनगर चौक पुणे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे वडिल यातील नमुद इसम नामे तानाजी कांबळे यांनी फिर्यादी यांची आई नामे सौ.मधुरा तानाजी कांबळे वय ४२ वर्षे,रा.सदर हिने त्यांच्या करीता जेवण बनविले नाही याचा राग मनामध्ये धरुन तिला लाथा बुक्कयांनी मारहाण करुन, तिच्या कानाखाली मारुन तिला जिवे ठार मारण्याचे उद्देशाने तिच्या छातीमध्ये जोराने बुक्क्या मारुन तिला खाली पाडुन जिवे ठार केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.स्वप्निल पाटील,मो.नं.९०२१७४७३७६ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो.स्टे.२७०/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४८ वर्ष रा.कोंढवा पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २२/१२/२०२३ रोजी सकाळी ११/३० वा.चे.सुमारास आई माता मंदिर,गंगाधाम रोड बिबवेवाडी पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मोबाईल फोनवर बोलत असताना नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,अचानक त्यांना धक्का देवून त्यांचे शर्टच्या खिशातील ८००००/- रु.किं.चा दुसरा मोबाईल जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.एस.एम.अदलिंग,मो.नं.९०२८०४५४५४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो.स्टे.२००/२०२३,भादविक ३०७,१४३,१४४,१४७,१४८,१४९ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१)सह १३५. |
| **फिर्यादी** | एक अल्पवयीन वय १७ वर्षे रा.कर्वेनगर,पुणे |
| **आरोपीत** | १) आदित्य अनिल पुरी वय १८ वर्षे रा कर्वेनगर गोसावी वस्ती दशरथ क्षिरसागर यांचे घरी कर्वेनगर पुणे २) यश राहुल कोंडे वय १८ वर्षे रा महाराजा पॅलेस फ्लॅट नं ३०८ नऱ्हे रोड नवले ब्रीजजवळ नऱ्हे पुणे ३) सुयश सचिन ढोरे वय १८ वर्षे रा शिवपार्वती मंगल कार्यालय सिल्वर हाऊस लेन नऱ्हेगाव पुणे ४) यश मारुती शिंदे वय १८ वर्षे रा धायरेश्वर मंदिरामागे पोकळे वस्ती धायरी पुणे (अटक) एक विधिसंर्घषित बालक यास पालकांच्या ताब्यात दिले आहे.व एक जखमी विधिसंर्घषित बालक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २२/१२/२०२३ रोजी १५/०० वा.चे सुमारास स्पेन्सर चौक,लक्ष्मी टेरेस बिल्डींग समोरील,सार्वजनिक रोडवर,कर्वेनगर,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी याचा मावस भाऊ याची व यातील नमुद इसम नामे अदित्य चुरी यांचेशी भांडणे झाल्याने त्यास समजावुन सांगण्यासाठी फिर्यादी व त्यांचे मित्र यांनी बोलविले असता सदर ठिकाणी अदित्य चुरी हा त्याचे वरील ५ इसमांना घेवुन आला असता त्यांच्यात बाचाबाची झाली. त्यावेळी त्याचे सोबत असलेल्या जखमी विधिसंर्घषित याने फिर्यादी व त्याचा मित्र याचेवर जीवे ठार मारण्याचे उद्देशाने लोखंडी हत्याराने वार करून जखमी केले. तसेच फिर्यादी व त्याचे मित्राने सिमेंटचा ब्लॉक मारल्याने विधिसंर्घषित बालक जखमी झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.सुर्यकांत सपताळे,मो.नं.९६२३७५०३२१ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे ३०५/२०२३,भादविक ३५३,३२३,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | बालय्या नगरीकंटी वय ५१ वर्षे,रा.घोरपडी बाजार पुणे |
| **आरोपीत** | चार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/१२/२०२३ रोजी १८.४५ वा.चे सुमा.मोना फुड रेस्टॉरन्टचे समोर एम.जी.रोड कॅम्प पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे कॅन्टोमेंट पुणे येथे मुकादम म्हणुन नोकरीस असुन वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी व त्यांचे सहकारी पोलीसांसह एमजी.रोडवर अनाधिकृत पथारीवाले यांचेवर कारवाई करीत असताना वरील नमुद इसम हे रोडवर बँग विक्री करीत असलेने त्यांना रोडवर बँग विक्री करु नका, तुमचेमुळे ट्राफीक जाम होत असुन लोकांना त्रास होतो असे सांगत असताना त्यांनी फिर्यादी यांची कॉलर पकडुन ढकलुन दिले तसेच सहकारी अरबाज शेख यास मारहाण करुन शिवीगाळ व दमदाटी करुन सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.विजय बनसोडे मो.नं.९९६०८७८५१७ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ९३३/२०२३,भादविक ४२०,४०६ |
| **फिर्यादी** | एक महिला वय ६८ वर्षे रा.सुतारवाडी पाषाण पुणे |
| **आरोपीत** | दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/१२/२०२३ रोजी दु.०१/३० वा.चे.दरम्यान पी.एम.टी.बस डेपो शेजारी सुतारवाडी पाषाण पुणे येथील हरी प्रोव्हिजन स्टोअर्स या दुकानात |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया दुकानात हजर असताना वरील नमुद दोन इसम दुकानात आले व त्यातील एकाने फिर्यादी यांना माझे गुरुंनी आज शनिवार असल्याने सोन्याच्या दागिन्यांना स्पर्श करुन पाया पडुन शनिदेवाला जा असे सांगितले आहे. मला तुमच्या बांगडया काढुन देता का. मी पाया पडुन लगेच तुम्हाला परत करतो असे म्हणाला असता त्यावर विश्वास ठेवुन फिर्यादी यांनी डाव्या हातातील सोन्याची बांगडी काढुन त्यास दिली.त्याने ती बांगडी एका कागदात गुंडाळुन त्याचेकडील असलेल्या प्लास्टिकच्या पिशवीत ठेवली व पिशवीचे तोंड गाठ बांधुन बंद केले.त्यावर फिर्यादी यांनी त्यास बांगडी परत कर असे म्हटले असता त्याने त्याचेकडील पिशवी परत करुन लागलीच तेथुन लगबगीने निघुन गेले.त्यानंतर फिर्यादी यांनी पिशवीची गाठ सोडुन पिशवीत हात घालुन पाहीले असता सोन्याची बांगडी मिळुन आली नाही.तेव्हा फिर्यादी यांना लक्षात आले की सदर इसमांनी विश्वास संपादन करुन सोन्याची बांगडी काढुन घेवुन हातचलाखीने त्याचेकडील स्टीलच्या धातुची बांगडी परत करुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.रुपेश चाळके मो.नं.९५५२५२६६०३ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ९३३/२०२३,भादविक ३०७ |
| **फिर्यादी** | एक महिला वय ५६ रा.वानवडी पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २२/१२/२०२३ रोजी रात्रौ २०/३० ते २१/०० वा.चे दरम्यान काकडे मैदान,संविधान चौकाजवळ,वानवडी पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे पती यांनी काकडे मैदान,संविधान चौकाजवळ, वानवडी पुणे येथे सुरु केलेल्या नेचर ॲग्रो टुरिझम नावाने हॉटेल व्यवसायाचे भाडे करार केला नाही तसेच पैसे दिले नाही या कारणावरुन यातील नमुद इसम याने फिर्यादी यांचे पती वजीर शेख यांचे तोंडावर तीन चार वेळा दगडाने मारुन गंभीर जखमी करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.दत्तप्रसाद शेंडगे मो.नं.९०११२५३००३ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो.स्टे.२७१/२०२३,भादविक ३९२,३५३,३३२,५०४,४२७,३४ |
| **फिर्यादी** | श्याम कांबळे वय ३१ वर्ष रा.कोंढवा,पुणे |
| **आरोपीत** | १)विनायक जयसिंग बडगुजर वय ३४ वर्षे,रा.सुखसागर नगर,बिबवेवाडी,पुणे २) सचिन जयसिंग बडगुजर वय ३८ वर्षे,रा.सदर (अटक) व इतर दोन (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २३/१२/२०२३ रोजी सायंकाळी १८/४५ वा.चे.सुमारास अप्पर इंदीरानगर बस स्टॉप बिबवेवाडी पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पीएमपीएमएल बस वर वाहक म्हणुन सरकारी कर्तव्य करीत असताना वर नमुद इसम यांनी तिकीट काढण्याच्या कारणावरुन फिर्यादीशी वाद घालुन त्यांना पकडुन हाताने मारहाण केली व तिकीट काढण्याची मशीन फोडुन त्याचे नुकसान केले.तसेच फिर्यादीच्या खिशातील दोन जणांनी रोख रक्कम ४५३५/-रुपये बळजबरीने हिसकावुन काढुन घेवुन चोरी करुन पळुन गेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.नरेंद्र शिंदे मो.नं.८८८८३५०४०४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**